# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## Savitribai Phule Pune University
### Formerly Pune University

अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
गणेशखिंड, पुणे – ४११००७
दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५६२१०४८/४९
ई–मेल : iqac@unipune.ac.in
संकेतस्थळ - www.unipune.ac.in

Internal Quality Assurance Cell
Ganeshkhind, Pune – 411007
Contact No. : 020-25621048/49
E-mail - iqac@unipune.ac.in
Website – www.unipune.ac.in


अंगुसिक/२६४ दिनांक : १४/०६/२०२४

**अत्यंत महत्वाचे व तातडीचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय : ''राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'' अंमलबजावणीच्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत असलेल्या सर्व संलग्नित महाविद्यालयांचे/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. प्राचार्य आणि संचालक यांच्या एकदिवसीय कार्यशाळेबाबत....**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (National Education Policy) अंमलबजावणीच्या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत असलेल्या सर्व संलग्नित महाविद्यालयांचे/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. प्राचार्य आणि संचालक यांच्या एकदिवसीय कार्यशाळा दि. १० जून, २०२४ पासून पुढील १५ दिवसांमध्ये आयोजित करण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (National Education Policy) अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून पदवीस्तरावर करण्यात येणार आहे. याअनुषंगाने अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षातर्फे खालीलप्रमाणे कार्यशाळा प्रस्तावित करीत आहोत :

| अ. क्र. | प्रभाग | कार्यशाळांचे ठिकाण | कार्यशाळा आयोजित करणाऱ्या प्राचार्यांचे नाव | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे शहर (पश्चिम भाग) | टिकाराम जगन्नाथ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खडकी, पुणे – ४११००३ | डॉ. संजय चाकणे | ९८९०१७१८५७/ ७०२०६७४५४५ |
| २ | पुणे शहर (पूर्व भाग) | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे – ४११०२८ | डॉ. नितीन घोरपडे | ९८५०१५१९१० |
| ३ | सर्व ग्रामीण पुणे जिल्हा | मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालय,सोमेश्वरनगर,बारामती, पुणे – ४१२३०६ | डॉ. देविदास वायदंडे | ९८६०१६४६१२/ ९८२३०७९२१६ |
| ४ | अहमदनगर शहर | अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, न्यू कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,लाल टाकी रोड, अहमदनगर–४१४५०२ | डॉ. बाळासाहेब सागडे | ९८२२९६५७३५ |
| ५ | अहमदनगर ग्रामीण | प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, पद्मश्री विखे पाटील आर्टस, सायन्स व कॉमर्स महाविद्यालय, प्रवरानगर लोणी, अहमदनगर – ४१३७१३ | डॉ. प्रदीप दिघे | ९४२३७८७४१५ |
| ६ | नाशिक शहर | महात्मा गांधी विद्यामंदिर, लोकनेते व्यंकटराव हिरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पंचवटी, नाशिक – ४२२००३ | डॉ. बापू जगदाळे | ७८८७८९९९८५ |
| ७ | नाशिक ग्रामीण | मराठा विद्या प्रसारक समाज, कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सटाणा,नाशिक – ४२३३०१ | डॉ. विजय मेदणे | ९४२३९६८४३४ |

उपरोक्त कार्यशाळांमध्ये सर्व संलग्नित महाविद्यालयांचे/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. प्राचार्य आणि संचालक यांच्या मनातील शंकाचे निरसन सविस्तरपणे होणार आहे. तसेच, पदवी स्तरावरील नव्याने प्रस्थापित केलेले आराखडे आणि पहिल्या वर्षाच्या अभ्यासक्रम याविषयी महाविद्यालये/परिसंस्था स्तरावर कोणताही संभ्रम राहू नये यासाठी सदर कार्यशाळांचे आयोजन करण्याची आवश्यकता आहे.

त्यानुसार, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (National Education Policy) चा सुयोग्य नियोजनाचा आराखडा तयार करुन तो यशस्वी होण्यासाठी आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपरोक्त एकदिवसीय कार्यशाळेस सर्व संलग्नित महाविद्यालयांचे/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. प्राचार्य आणि संचालक यांनी सदर कार्यशाळेबाबत काही शंका असलेस आपल्या प्रभागात आयोजित होणाऱ्या महाविद्यालयातील प्राचार्याशी संपर्क साधावा. कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

(प्रा. डॉ. संजय ढोले)
मा. संचालक
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ